श्री.रामदास चव्हाण, अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नांव व पत्ता :- समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे-५

दूरध्वनी क्रमांक :-२५५०१२८१
कार्यालयीन वेळ :- स.९.४५ ते सायंकाळी ६.१५
खात्याचा ई-मेल:- sdd@punecorporation.org
जावक क्रमांक :- सविवि/ ५३३
दिनांक :- ०५/०६/२०२६

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.
अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. ३ /२०२६

अपिलार्थी नांव व पत्ता :-
श्री. बन्सी दादा गाडे
स.नं. ८, यशवंत नगर, दुर्गामाता चौक,
येरवडा, पुणे -६
मो. नं. ७५०७०६६८१०

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
श्री. असंग पाटील,
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

श्री. बन्सी दादा गाडे- --- अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी,पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी दिनांक १२/२/२०२६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक	माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक	अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
१२/२/२०२६	११/३/२०२६	२/३/३०३६	-	१४/५/२०२६

Scanned with OKEN Scanner

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक ६/३/२०२६ रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना दिलेल्या माहिती समाधानकारक नसल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

प्रथम अपील अर्जाचा तपशील				
प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ?	प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ?	प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक
१/३/२०२६	६/३/२०२६	होय	लागू नाही	१४/५/२०२६

<u>प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-</u> दिनांक २५/५/२०२६, स. ११.०० वाजता.

<u>सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-</u> दिनांक २५/५/२०२६रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: अनुउपस्थित होते.

<u>सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-</u> दिनांक २५/५/२०२६ रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-

अ.क्र.	अर्जदाराने मागितलेली माहिती	जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती
१	यशवंत नगर येरवडा, येथील समाज मंदिरांचे २०२३ ते २०२६ पर्यंत एकुण भाडे किती झाले तसेच किती भाडे भरले आहेत.	आद्य क्रांतीवीर लहुजी साळवे युवक संघ या संस्थेस देणेसाठी मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. १३८, दि.२५/८/२०२३ अन्वये मान्यता मिळालेली असून सदर मिळकतीचे मासिक भाडे र.रू. २,१५,३०४/- असून या वास्तूच्या वापराकरीता करारनामा करणे पुर्वी तीन महिन्याचे भाडे रक्कमे इतकी रक्कम अनामत र.रू. ६,६०,०६३ /- व तीन महिन्याचे आगावू भाडे र.रू. ६,६०,०६३ /- भरणे आवश्यक आहे. संस्थेने तीन महिन्याचे भाडे रक्कमे इतकी रक्कम अनामत र.रू. ६,६०,०६३ /-चा भरणा केलेला आहे. संस्थेने अद्याप तीन महिन्याचे आगावू भाडे र.रू. ६,६०,०६३ /- चा भरणा केलेला नसल्याने संस्थेसोबत करारनामा करणेत आलेला नाही.

Scanned with OKEN Scanner

२	१६/१०/२०२५ सिल केले होते कसे तोडून घेतले त्यावर कार्यवाही का झाली नाही, एकुण तीन वेळेला सिल केले होते मग ते कसे उघडण्यात आले, सदर संस्थेचे पदाधिकारी कोण आहे त्याची नावे द्यावीत	सदर वास्तूस केलेले सिल तोडल्याचे निदर्शनास आल्याने समाज विकास विभागाने जा. क्र. सविवि/३३२५, दि. १७/२/२०२६ रोजीची नोटीसीची प्रत पोलिस विभागास देणेत आली आहे. संस्थेंच्या पदाधिकाऱ्यांची नावे सोबत जोडत आहे.
३	समाज मंदिर भाड्याने दिले जाते ते पुणे मनपाने भाडे ठरवून दिले आहे का	दि.६/११/२०२३ पुर्वी मा.शहर अभियंता यांच्या मान्यतेने भाडे निश्चित केले जात होते. यानुसार सदर वास्तूचे भाडे निश्चित केले आहे. तद्नंतर महाराष्ट्र शासन राजपत्र दि.६/११/२०२३अन्वये भाडे निश्चितीची कार्यवाही केली जाते.
४	सदर संस्थेचे ऑडिट तपासण्यात आले आहे का? त्याचा करार झाला नसतांना तीच संस्था समाज मंदिर का चालवते	संस्थेस मान्यता देते वेळी संस्थेने प्रस्ताव सादर करतेवेळी जोडलेला ऑडिट अहवाल तपासला आहे.
५	दि. १९/१२/२०२० रोजी आपण टेंडर काढणार होते ते का काढले नाही त्याची माहिती मिळावी.	दि. १५/१२/२०२२ रोजी वर्तमान पत्रात जाहिरात देवून कार्यवाही केली आहे.

"विवेचन"

सदर बाबत अपिलार्थी यांनी यशवंत नगर येरवडा, येथील समाज मंदिरांचे २०२३ ते २०२६ पर्यंत एकुण भाडे तसेच माहिती अधिकारात विचारलेले मुद्दा क्र. १ ते ५ बाबींची कुठलीच उत्तरे मिळाली नाही असे अपिलार्थी यांनी अपिल सुनावणीचे वेळे म्हटले आहे. सदर करारनामा केलेला नाही तरी देखील समाज मंदिराचा ताबा कसा दिला समाज मंदिराला सील केले होते. सील कसे तोडले त्यावर काय कार्यवाही केली माहिती अधिकारात दिलेली उत्तरे समाधान कारक नाही. अनामत रक्कम भरलेली नाही. संस्थेने जे भाडे ठरवले आहे ते कसे ऑडिड तपासणी, करार, ठराव कागदपत्रे घेतली करारनामा झाली नाही तर कागदपत्रे कशी घेतली, संस्थेचे ऑडीट, डॉकेट ठराव रजिस्टर त्याची प्रत घेणे. र.रू. १५,३०४/- कार्यकारी मंडळाला मान्य आहे का?

ठराव क्र. १३८ रद्द करून हॉस्पिटलचा प्रस्ताव तयार करावा अशी मागणी केली आहे.

Scanned with OKEN Scanner

"आदेश"

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी सादर केलेल्या विवेचनानुसार संपूर्ण डॉकेटची फाईल, सर्व कागदपत्रे अपिलार्थी यांना उपलब्ध करून देणेत यावे

(रामदास तोंडे)
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

दिनांक :-
ठिकाण :- पुणे.

टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

४) श्री. बन्सी दादा गाडे, स.नं. ८, यशवंत नगर, दुर्गामाता चौक, येरवडा, पुणे -६
मो. नं. ७५०७०६६८१०

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी

Scanned with OKEN Scanner